# जि.प.प्राथमिक शाळा शेजबाभुळगाव येथे सायबर सुरक्षेवर जनजागृती कार्यक्रम



मंगळवेढा (प्रतिनिधी) : जि.प.प्राथमिक शाळा शेजबाभुळगाव येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुल क्विक हिल फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमामध्ये संगणकशास्त्र संकुलातील विद्यार्थिनी तेजश्री पवार व तृप्ती पवार यांनी सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी आजच्या ऑनलाईन युगामध्ये होणाऱ्या विविध प्रकारच्या फसवणुकी बद्दल उदहरणाद्वरे माहिती दिली व आपली फसवणूक होऊ नये म्हणून त्याबद्दल खात्री करूनच त्यावर विश्वास ठेवावा त्यासाठी ओटीपी कोणाला सांगू नये, अनोळखी नंबर वरून आलेले फोन पडताळणी करून घ्यावे, व्हॉट्सअँप व इतर सोशल मीडियावर आलेल्या मेसेजेस व लिंकची शहानिशा करावी व त्यानंतर पुढील प्रक्रिया करावी. त्यासाठी मोबाईल, कॉम्प्युटर, लॅपटॉप इत्यादी साधनांवर अधिकृत अँटीव्हायरसचा वापर करावा असे त्यांनी स्पष्ट केले. अध्यक्षीय स्थानावर असलेले शाळेचे प्राचार्य जे. पी. मदने यांनी मार्गदर्शन केले.

दै.स्वाभिमानी छावा